जाहिरात छोटी
संधी मोठी
संपर्क करा
8850541939
9821004969

साप्ताहिक

RNI No. MAHMAR/2011/39072

# युवा सह्याद्री

मुख्य संपादक: अरुण आत्माराम माळी

वृत्तपत्र नव्हे, चळवळ

मुंबई | वर्ष : १५ | अंक : ४८ | बुधवार दिनांक : १७ डिसेंबर ते २३ डिसेंबर २०२५ | पृष्ठ : ८ | कार्यकारी संपादक : विवेक मोरे | मूल्य : २ ₹

## सावरकरांचा राजकीय वापर ! भाजप आरएसएसचा इतिहास की हेतुपुरस्सर भ्रमनिर्मिती ?

सध्या देशाच्या राजकारणात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे नाव वारंवार चर्चेत आणले जात आहे. भाजप आणि आरएसएस कडून **"सावरकर आमचेच"** असा कांगावा केला जात असताना, प्रत्यक्ष इतिहास मात्र वेगळेच वास्तव सांगतो. प्रश्न असा उपस्थित होतो की, सावरकरांचा सन्मान करण्यासाठी त्यांचे नाव घेतले जाते की राजकीय स्वार्थासाठी त्यांचा वापर केला जात आहे?




**सावरकर आणि हिंदू महासभा :** निर्विवाद सत्य सावरकर हे हिंदू महासभा या राजकीय पक्षाचे दीर्घकाळ राष्ट्रीय अध्यक्ष होते. हिंदू राष्ट्रवादाची त्यांची भूमिका स्पष्ट, ठाम आणि राजकीय होती. त्यांनी हिंदू महासभेला संघटित, वैचारिक आणि राजकीय बळ देण्याचे कार्य केले.

**महत्त्वाचे म्हणजे—** सावरकरांनी कधीही काँग्रेसशी वैचारिक जवळीक स्वीकारली नाही, तसेच सत्ता-समीकरणांसाठी तडजोडी केल्या नाहीत.

**आरएसएस आणि हिंदू महासभा : सुरुवातीचा संबंध** आरएसएसची सुरुवात ही हिंदू महासभेच्या वैचारिक वातावरणातच झाली होती. प्रारंभी आरएसएस ही हिंदू महासभेची एकप्रकारची संघटनात्मक शाखा मानली जात होती. मात्र, पुढे राजकीय स्वार्थ आणि सत्तेच्या गणितांमुळे आरएसएसने हिंदू महासभेपासून फारकत घेतली.

**भारतीय जनसंघाची स्थापना आणि सावरकरांचा नकार-** हिंदू महासभे पासून वेगळे होत आरएसएस प्रणित भारतीय जनसंघ पक्षाची स्थापना करण्यात आली. त्या काळात सावरकरांना देखील जनसंघात सामील होण्याचे निमंत्रण देण्यात आले, असे राजकीय इतिहासात नमूद आहे. परंतु येथेच एक निर्णायक वळण येते. सावरकरांनी भारतीय जनसंघात जाण्यास स्पष्ट नकार दिला.

कारण जनसंघाची विचारधारा ही अनेक बाबतीत काँग्रेसच्या केंद्रीकृत, राज्यनियंत्रित धोरणांशी साधर्म्य साधणारी होती आणि सावरकरांना हे मान्य नव्हते. त्यांनी वैचारिक तडजोड न करता आजीवन हिंदू महासभेतच राहणे पसंत केले. हा निर्णय म्हणजेच सावरकरांनी आरएसएस व जनसंघाशी केलेली स्पष्ट काडीमोड होती.

**इतिहास वेगळा, आजचा दावा वेगळा -** इतिहास स्पष्ट सांगतो की, १९४२ नंतर सावरकरांचा आरएसएसशी थेट संबंध नव्हता. त्यांनी भारतीय जनसंघात प्रवेश नाकारला. भाजप हा जनसंघाचा उत्तराधिकारी असला तरी सावरकर भाजपचे कधीच नेते नव्हते. असे असताना आज भाजपकडून "सावरकर आमचे" असा दावा केला जातो. हा दावा इतिहासावर आधारित नसून राजकीय गरजेपोटी उभा करण्यात आलेला आहे.

**राजकीय स्वार्थासाठी सावरकरां-चा मुद्दा?**
सावरकरांचे नाव वारंवार पुढे करून विरोधकांना प्रतिक्रिया देण्यास भाग पाडले जाते. त्यानंतर "सावरकरांचा अपमान" असा आरोप करत भावनिक राजकारण केले जाते. खऱ्या प्रश्नांपासून महागाई, बेरोजगारी, शेतकरी संकट, शिक्षण, आरोग्य यावरून जनतेचे लक्ष हटवले जाते. या प्रक्रियेत प्रत्यक्षात सावरकरांचा अपमानच होत आहे, कारण त्यांचे व्यक्तिमत्त्व अभ्यासा ऐवजी राजकीय शस्त्र बनवले जात आहे.

**सावरकर कोणाचे?**
स्वातंत्र्यवीर सावरकर हे हिंदू महासभा पक्षाचे सलग ६ वर्षे राष्ट्रीय अध्यक्ष होते. ते इतिहासाचे, विचारांचे आणि राष्ट्राच्या बौद्धिक प्रवाहाचे आहेत. त्यांना भाजपच्या मालकीचे ठरवणे, आणि त्या मालकीच्या नावाखाली राजकीय संघर्ष पेटवणे हे सावरकरांच्या विचारांनाच विरोधी ठरते.

थोडक्यात काय तर, आज सावरकरांचा मुद्दा उपस्थित करून भाजपकडून जो राजकीय गदारोळ केला जातो, तो सन्मानासाठी कमी आणि राजकीय लाभासाठी अधिक असल्याचे चित्र आहे.

इतिहास जसा आहे तसा मांडण्या ऐवजी, इतिहासाचे निवडक तुकडे वापरून भ्रमनिर्मिती केली जात असल्याचा आरोप त्यामुळे अधिक बळकट होतो.

**अरुण आत्माराम माळी**
**अखिल भारत हिंदु महासभा**



**आज केंद्रीय गृहमंत्री मा. अमित शाह साहेबांची भेट घेऊन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला राष्ट्रीय नेते स्व. दि. बा. पाटील साहेब यांचे नाव देण्याच्या मागणीची पुन्हा एकदा ठामपणे आठवण लोकनेते खासदार बाळ्या मामा यांनी करून दिली. स्व. दि. बा. पाटील साहेब यांनी कोकणातील शेतकरी, भूमिपुत्र आणि सर्वसामान्यांच्या हक्कासाठी दिलेले योगदान अतुलनीय असून त्यांच्या कार्याचा सन्मान होणे ही संपूर्ण महाराष्ट्राची भावना आहे.**

**या मागणीसाठी येत्या २२ तारखेला होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन हा लढा अधिक बळकट करावा, असे आवाहन देखील बाळ्या मामा यांनी सर्व समाजाला करून दिली.**



संपादक -
अरुण आत्माराम माळी
मो. 9821004969

## संपादकीय

# "विकास कोणासाठी ? सार्वजनिक कर्ज आणि खासगी फायद्यांचा प्रश्न"

लोकशाहीत विकास हा जनतेसाठी असतो; पण जेव्हा विकासाची दिशा सातत्याने काही निवडक खासगी उद्योगांच्या फायद्याभोवती फिरताना दिसते, तेव्हा प्रश्न विचारणे अपरिहार्य ठरते. आज भारतात हाच प्रश्न अधिक तीव्र होत आहे — सरकारी प्रकल्प खरोखरच सार्वजनिक हितासाठी आहेत की काही मोजक्या कॉर्पोरेट समूहांच्या सोयीसाठी?

सध्याच्या काळात केंद्र सरकार मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा प्रकल्प राबवत आहे — बंदरे, विमानतळे, महामार्ग, ऊर्जा प्रकल्प. कागदावर हे सर्व "राष्ट्रीय विकास" म्हणून मांडले जात असले, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत याच प्रकल्पांचे व्यवस्थापन, कंत्राटे आणि दीर्घकालीन लाभ काही विशिष्ट खासगी उद्योगांकडे केंद्रित होताना दिसतात, हे नाकारता येत नाही.

अनेक प्रकरणांत सरकारी मालमत्ता थेट विक्रीऐवजी दीर्घकालीन भाडेपट्टा, PPP मॉडेल किंवा सवलतीच्या अटींवर खासगी कंपन्यांच्या ताब्यात दिल्या जात आहेत. प्रश्न असा आहे की—

**जोखीम सरकारची, कर्ज जनतेच्या नावावर, पण नफा खासगी कंपन्यांचा — ही रचना लोकशाही अर्थव्यवस्थेला कितपत योग्य आहे?**

विशेषतः अदानी समूहासारख्या मोठ्या कॉर्पोरेट घराण्यांचा उल्लेख वारंवार चर्चेत येतो. बंदरे, विमानतळे, ऊर्जा, कोळसा, लॉजिस्टिक्स — विविध क्षेत्रांत सरकारी धोरणे आणि या समूहाचा विस्तार यामध्ये असलेली सुसंगती केवळ योगायोग आहे का, की धोरणात्मक निवड? सरकार "सर्व काही नियमांनुसार" असल्याचा दावा करते, पण नियम कोणासाठी आणि कशा पद्धतीने बदलले जातात, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

यात आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे विदेशी आणि सार्वजनिक कर्जाचा वापर. मोठ्या प्रकल्पांसाठी सरकार कर्ज घेते, पण त्या प्रकल्पांचा थेट फायदा जर काही खासगी उद्योगांना होत असेल, तर कर्जाचा भार मात्र संपूर्ण जनतेवर येतो. हीच रचना श्रीलंकेसारख्या देशांना संकटात घेऊन गेली — जिथे विकासाचे प्रतीक म्हणून उभारलेले प्रकल्प शेवटी जनतेसाठी ओझे ठरले. हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की उद्योगस्नेही धोरणे असणे चुकीचे नाही; खासगी गुंतवणूक विकासासाठी आवश्यकच आहे. पण धोरणे जर उद्योगस्नेही न राहता उद्योग-केन्द्रित आणि उद्योग-आधारित सत्तेसारखी वाटू लागली, तर तो लोकशाहीसाठी धोक्याचा इशारा ठरतो.

खरा प्रश्न सरकारच्या हेतूचा नसून जबाबदारीचा आणि पारदर्शकतेचा आहे. कोणत्या प्रकल्पाचा फायदा किती, कोणाला, आणि किती कालावधीत होणार आहे — याची स्पष्ट, सार्वजनिक मांडणी होणे ही लोकशाहीची गरज आहे. अन्यथा "राष्ट्र उभारणी"च्या नावाखाली "कॉर्पोरेट उभारणी" होत असल्याचा संशय अधिक बळावतो. भारताची अर्थव्यवस्था आज मजबूत आहे, यात शंका नाही. पण इतिहास सांगतो की अर्थव्यवस्थेचा पाया कमकुवत होत नाही; तो हळूहळू आतून पोखरला जातो, जेव्हा सत्ता, पैसा आणि धोरणे एकाच दिशेने झुकतात.

आज प्रश्न विचारणे म्हणजे देशद्रोह नाही. उलट, आज प्रश्न न विचारणे म्हणजे उद्याच्या संकटाला निमंत्रण देणे होय.

**थोडक्यात काय तर, "कर्ज जनतेचं, जोखीम सरकारची आणि नफा मात्र खासगी कंपन्यांचा- हा विकासाचा फॉर्म्युला टिकाऊ नसून धोकादायक आहे."**



स्वतंत्र कोकणराज्य अभियानाचे संस्थापक अध्यक्ष श्री. संजय राव कोकरे यांच्या उपस्थितीत सुप्रसिद्ध वकील तथा सामाजिक कार्यकर्ते सामानीय श्री. राजीव दत्ताराम बिले यांना "कोकणरत्न" ही मानद पदवी प्रदान करण्यात आली त्यावेळचा हा सुवर्णक्षण...

# ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग समाजसेवकांचा जिल्हाधिकारी मा. श्रीकृष्णनाथ पांचाळ साहेबाच्या हस्ते सन्मानित करण्यात आले...

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग संस्था व विविध संघटना ह्या दिव्यांग,विधवा महिला,जेष्ट नागरिक तसेच वंचित बहुजन वर्गाच्या विविध योजनांची माहिती व मार्गदर्शन करुन जनजागृती करतअसतात.

ठाणे महानगरपालिकाच्या वतीने "जागतिक दिव्यांग दिन "साजरा करत असताना दिव्यांग जिद्द शाळेतील विद्यार्थ्यांनी ठाणे येथील तळावपाळी येथील-गडकरी रंगातन नाट्यगृहात मनोरंजन कार्यक्रम सादर केला. व ठाणे महानगर पालिका समन्वय समिती चे सदस्य संस्था समाजसेवक पदाधिकारी यांचा या जागतिक दिव्यांग दिनाच औचित्य साधून दिव्यांग ह्युमन राईट फेडरेशन चे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.भरत



जाधव सर व सदस्य दिव्यांग संमन्वय समिती यांचा प्रमुख अतिथी जिल्हाधिकारी मा.डॉ. पांचाळ साहेब यांच्या हस्ते दिव्यांग समाजसेवक म्हणून सन्मानित करण्यात आले.याप्रमाणे दिव्यांग संमन्वय समिती ठामपा सदस्य संस्था च्या पदाधिकारी सन्मान जिल्हाधिकारी हस्ते करण्यात आला.यामुळे दिव्यांग क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्था व समाज सेवक पदाधिकारी यांच्यात उत्साह निर्माण झाला.केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार यांनी दिव्यांग कायदा २०१६ नुसार दिव्यांगच्या हक्क,न्याय व संरक्षण,सन्मान,समान हक्क संधी प्राप्त करुन देण्यासाठी कडक कारवाई करावी. हि मागणी समाजसेवक पदाधिकारी यांनी शासनाकडे केली.

# शिवबावनी सादरीकरण २०२६ स्पर्धेचे आयोजन

मुंबई (रवींद्र मालुसरे) : शिवबावनी म्हणजे कवी भूषण यांनी रचलेली ५२ छंदांची (ओळींची) कविता, ज्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि हिंदू धर्माच्या रक्षणाचे तेजस्वी वर्णन आहे; ही कविता ब्रज भाषेत असून ती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या सैन्याच्या पराक्रमाची कल्पना देते. थोडक्यात, 'शिवबावनी' हे शिवाजी महाराजांच्या गौरवाचे आणि त्यांच्या पराक्रमाचे वर्णन करणारे एक वीर रसपूर्ण काव्य आहे. श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने "शिवबावनी सादरीकरण स्पर्धा-२०२६" आयोजित करण्यात आली असून, ही स्पर्धा ऑनलाइन स्वरुपात घेण्यात येईल. प्रवेशिका व सादरीकरण व्हिडीओ पाठवण्यासाठी https://forms.gle/UvJbCHppaNHtgrRR9 संकेत स्थळावर जावे. विजेत्या स्पर्धकांना एका भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेविषयी अधिक माहितीसाठी पंकज भोसले - ९८२१००९१३७ सुलभा कोरडे - ८०९७३२६६९९ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे प्रमुख हेमंतराजे गायकवाड यांनी केले आहे

# शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण श्रध्दांजली

भारतीय राजकारणातील एक संयमी, सुसंस्कृत आणि लोकशाही मूल्यांवर निष्ठा ठेवणारे नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा ७ टर्म खासदार राहिलेले माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन ही केवळ एका नेत्याची नाही, तर एका मूल्यनिष्ठ राजकीय परंपरेची मोठी हानी आहे.शिवराज पाटील चाकूरकर यांनी सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा, सौम्यता आणि संविधानिक निष्ठा यांचा आदर्श ठेवला. महाराष्ट्रातून राष्ट्रीय पातळीवर पोहोचलेले हे नेतृत्व संसदेत, मंत्रिमंडळात आणि प्रशासकीय पातळीवरही समतोल विचारांसाठी ओळखले गेले. गृहमंत्री म्हणून काम करताना त्यांनी देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या प्रश्नांकडे गंभीरतेने पाहिले, तर संसदेमध्ये त्यांनी नेहमीच संवाद, सहमती



आणि लोकशाही प्रक्रियेचा सन्मान राखला.राजकारणात तीव्र मतभेद असतानाही वैयक्तिक चारित्र्य, शांत स्वभाव आणि सभ्य भाषा ही त्यांची ओळख होती. सत्तेच्या राजकारणात न अडकता त्यांनी लोकशाही संस्थांचे महत्त्व अधोरेखित केले.

विशेषतः कायदा, प्रशासन आणि संसदीय परंपरा याबाबत त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील.आजच्या आक्रमक आणि व्यक्तिकेंद्री राजकारणाच्या काळात शिवराज पाटील चाकूरकर यांचे नेतृत्व हे मूल्याधिष्ठित राजकारणाचा संदर्भबिंदू ठरते. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही.त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.त्यांच्या कुटुंबीयांप्रती व असंख्य चाहत्यांप्रती मनःपूर्वक संवेदना.

# व्यापाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी शिवसेनेची सिडको रायगड भवन वर निदर्शने




(प्रतिनिधी , डॉ. भालचंद्र कासले) नवी मुंबई :सिडको अतिक्रमण विभागाच्या मनमानी कारभारा विरोधात आज शिवसेनेचे विभागप्रमुख बाळकृष्ण खोपडे, सह उपशहर प्रमुख प्रकाश आमटे, महिला उपशहर प्रमुख अंजलीताई भोईटे यांनी व्यापाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी रायगड भवन बेलापूर येथे निदर्शने केली.सिडको अतिक्रमण विभागाने दिनांक २७/११/२०२५ रोजी सानपाडा तुर्भेतील कियोस मार्केट मधील मारजिन स्पेस मधुन काही व्यापाऱ्यांच्या लाखो रुपये किंमतीच्या वस्तु जप्त केल्या होत्या. व्यापाऱ्यांनी वस्तु परत मिळाव्या म्हणून सिडको अतिक्रमण विभागाकडे विनंती अर्ज करुन देखील, सिडकोच्या आडमुठ्या धोरणामुळे त्या वस्तू आम्ही लिलावात काढू, तुम्हाला परत करणार नाही असे व्यापाऱ्यांना सांगितले.

त्यानंतर शिवसेनेचे विभागप्रमुख बाळकृष्ण खोपडे यांनी व्यापाऱ्यांसह दिनांक १२/१२/२०२५ रोजी रायगड भवन येथे मोर्चा काढल्या नंतर सिडकोच्या अतिक्रमण अधीकारी भातुसकर यांनी मध्यस्ती करुन नवी मुंबई मनपाचे धोरण पाहून व्यापाऱ्यांच्या वस्तू सोडवल्या जातील असे आश्वासन दिले. नंतर आंदोलन मागे घेण्यात आले. या वेळी मोठ्या प्रमाणावर पीडित व्यापारी सहभागी झाले होते.

# टॅगिंगशिवाय जनावरांची खरेदी-विक्री बंदच

## नियमभंग झाल्यास तीव्र आंदोलन : मिलिंद एकबोटे यांचा इशारा



सातारा: पुसेगाव (ता. खटाव) येथील जनावरांच्या बाजारात प्राणी संरक्षण कायद्याचे उल्लंघन होत असल्याचा गंभीर आरोप करत अखिल भारतीय कृषी व सेवा संघाने राज्य सरकारचे लक्ष वेधले आहे.टॅगिंग नसलेल्या पशुधनाची खरेदी-विक्री थांबवली नाही, तर यात्रेदरम्यान उपोषणासह तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा संघाचे प्रदेशाध्यक्ष मिलिंद एकबोटे यांनी पत्रकार परिषदेत दिला.या पत्रकार परिषदेला मानद पशु कल्याण अधिकारी माधव घुमाळ, ॲड. दत्तात्रय सणस, गोशाळा व्यवस्थापक वैभव सणस आदी उपस्थित होते.मिलिंद एकबोटे म्हणाले, “पुसेगाव बाजारात टॅगिंगविना बैलांची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणात होते आणि काही बैल थेट कत्तलीसाठी विकले जात असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येतात. हा प्रकार प्राणी संरक्षण कायद्याचा सरळ-सोट भंग आहे आणि अत्यंत चिंताजनक आहे.”१ जून २०२४ रोजी राज्य शासनाने पशुधनाच्या खरेदी-विक्रीसाठी जिओ-टॅगिंग अनिवार्य करणारा विशेष आदेश जारी केला आहे. तरीही, पुसेगावच्या बाजारात या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याने गोरक्षकांनी नाराजी व्यक्त केली.मिलिंद एकबोटे म्हणाले, “पुसेगाव नगरीला आध्यात्मिक महत्त्व लाभले आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या गोधनाचे जिओ-टॅगिंग बंधनकारक करण्यात यावे. यात्रेत टॅगिंग नसल्याने जनावरांना प्रवेश दिला जाऊ नये. शिवाय कसायांना व त्यांच्या हाताखालच्या लोकांना प्रवेशबंदी जाहीर करावी."गेल्या वर्षी गोरक्षकांनी जनावरांचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला असतानाही पुसेगाव पोलिसांकडून सहकार्य मिळाले नव्हते, असा आरोपही त्यांनी केला. यामुळे यावर्षी यात्रेच्या काळात स्वतंत्र पोलिस पथक नेमण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली.*नियम न पाळल्यास बाजार रद्दचा इशारा*मिलिंद एकबोटे म्हणाले, “जर जिओ-टॅगिंगची काटेकोर अंमलबजावणी झाली नाही, तर हा जनावरांचा बाजार तात्काळ रद्द करावा. अन्यथा महाराष्ट्रातील सर्व गोरक्षक पुसेगावमध्ये तीव्र आंदोलन उभारतील.”

# मोडी लिपी राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

मुंबई (रवींद्र मालुसरे) : श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने शिवोत्सव - २०२६ निमित्त मोडी लिपी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली असून, निबंध लेखनाचे विषय पुढील प्रमाणे आहेत. शिवरायांचे दुर्गविज्ञान, आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज, शिवरायांची युद्धनीती, हिंदूधर्मरक्षक शिवराय, शिवरायांचे बालपण असे आहेत. मोडी लिपीतील निबंधाचे देवनागरीतील लिप्यंतर देखील पाठवावे. https://forms.gle/mCj1XriJ1BsWHScR6 गूगल फॉर्म मध्ये निबंध उपलोड करणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी पंकज भोसले - 9821009137 किंवा अमित घाटये - 9833691856 यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे प्रमुख हेमंतराजे गायकवाड यांनी केले आहे

# आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल अध्यक्षपदी : कवी, साहित्यिक मनोहर पवार यांची निवड

बबनराव वि. आराख, पुणे : दरवर्षी आंतरराष्ट्रीय काव्य जागर अभियान अंतर्गत पूणे येथे आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल चे आयोजन मा. फुले प्रेमी विजय वडवेराव यांच्या अथक प्रयत्नाने केले जात असून, फेस्टिवलमध्ये भारतासह विदेशातूनही तमाम फुले प्रेमी, कवी साहित्यिक सहभागी होणार आहेत. दरम्यान सदर कार्यर्क्रमाची नोंद 'लिमका बुक'मध्ये झाली असून, या फेस्टिवल मध्ये कवी साहित्यिक मनोहर पवार केळवदकर यांची संमेलन अध्यक्षपदी निवड झाली आहे. यासंबंधीचे पत्र नुकतेच साहित्यिक मनोहर पवार यांना मिळाले असून, त्यांना सदर कार्यक्रमात काव्य वाचनासही आमंत्रीत करण्यात आले आहे . एस एम जोशी फाऊंडेशन सभागृह पुणे येथे आयोजित दुसरे



आंतरराष्ट्रीय फुले फेस्टीवल पुणे २०२६ चे दिनांक २,३,४, रोजी आयोजन करण्यात आले असून, महाराष्ट्रासह इतर राज्य आणि बाहेरील देशातून कवी सहभागी होणार आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील केळवद चिखली येथील प्रसिद्ध लेखक, कवी, शाहिर मनोहर पवार यांची या संमेलानात मुख्य आयोजक फुले जागर अभियानाचे प्रवर्तक फुलेप्रेमी मा. विजय वडवेराव यांनी एका निवड पत्राव्दारे घोषणा केली असून त्या कार्यक्रमात त्यांना निमंत्रीत केले आहे. कवी साहित्यिक मनोहर पवार यांनी यापूर्वीही या फेस्टिवल मध्ये सहभाग नोंदविला आहे. यांनी महाराष्ट्र, गोवा, गुजरात, पंजाब, मुंबई नागपूर, पुणे, आदी ठिकाणी विविध कला महोत्सव, अखिल भारतीय साहित्य संमेलनात सहभाग घेतला असून, त्यांना विविध पुरस्कार मिळाले असून विविध साहित्य चळवळीत पदाधिकारी असून साहित्य, कला, अभिनय, चित्र, लेखन यात सातत्याने सहभाग तसेच साहित्य सेवा अविरत सुरु आहे. या निवड सहभागासाठी त्याचे अभिनंदन होत आहे .

# मुंबईसह राज्यभरात थंडीचा जोर ओसरणार, पण गारवा मात्र कायम



मुंबई : मुंबईसह महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढला आहे. उत्तर भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे राज्यभरात तापमानाचा पारा खाली गेला आहे. राज्यातील अनेक शहरांत तापमान 10 अंशावर गेलं आहे. अशात आता या कडाक्याच्या थंडीपासून काहीसा दिलासा मिळणार असल्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. या आठवड्यात थंडीचा जोर काही प्रमाणात कमी होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

दिवसात तापमान उष्ण राहील, तर रात्री आणि पहाटे थंडी कायम राहील. पुढील 24 तासांत राज्यातील बहुतांश भागात तापमान किमान 10 ते 16 अंश सेल्सिअस असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे, तर कमाल तापमान 22 ते 26 पर्यंत असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मुंबईसह राज्यातील इतर भागात कसं असेल हवामान?

मुंबईसह कोकण, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि घाट परिसरात हवामान कोरडं राहण्याची शक्यता आहे. मुंबईत दिवसाचं तापमान जास्त असेल. त्या तुलनेने सकाळी थंडी कायम राहील. उंच भागात धुकं पडण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात कोरड्या हवामानासह आकाश निरभ्र राहील. राज्यातील सर्वाधिक थंड भाग हा विदर्भात राहण्याची शक्यता आहे. तर इतर अनेक जिल्ह्यांमध्ये तुलनेने किमान तापमानात मोठी घट होऊन थंडी काहीशी कमी होण्याची शक्यता आहे. थंडीच्या लाटेचं प्रमाण कमी होणार असून गारवा कायम राहील असं अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

# ठाणेकरांवर जलसंकट कायम ! शहरात 50 टक्के पाणीकपात करण्याचा निर्णय;



ठाणे: ठाणे शहरात गेल्या काही दिवसांपासून पाण्याच्या समस्या सुरू आहेत. 15 डिसेंबरपर्यंत जलवाहिनीच्या कामामुळे 30 टक्के पाणीकपात जाहीर केली होती. परंतू, ते काम अद्याप पूर्ण झाले नसून ठाणे शहरात आता 50 टक्के पाणी कपात करण्यात येणार आहे. यामुळे ठाणेकरांचे पुढील काही दिवस हाल कायम राहणार आहेत.

कल्याण फाटा येथील महानगर गॅसच्या कामांमध्ये ठाणे शहराला पाणीपुरवठा करणारी पिसे बंधारा येथून टेमघर जलशुध्दीकरण केंद्राकडे पाणी वाहून आणणारी 1000 मि.मी व्यासाची जलवाहिनी चार ते पाच वेगवेगळ्या ठिकाणी दिनांक 11 डिसेंबर 2025 रोजी नादुरूस्त झाली होती, सदर जलवाहिनी दुरूस्त करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे, परंतु या कामास आणखी 4 दिवसाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे, त्यामुळे ठाणे शहरात 19 डिसेंबर 2025 पर्यत 50 टक्के पाणी कपात लागू करण्यात येत आहे.

पाणीपुरवठा विभागामार्फत जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम तातडीने व जलदगतीने करण्यात येत आहे. मात्र जलवाहिनी जुनी व प्रिस्ट्रेस कॉंक्रीट पद्धतीची असल्यामुळे दुरुस्तीच्या कामासाठी विलंब होत असून हे काम पूर्ण होण्यास अजून 4 दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. परिणामी, ठाणे शहराकडे येणारा पाणीपुरवठा कमी झाला असून शहरामध्ये 50 टक्के पाणी कपात लागू करण्यात येत आहे.

**थकीत पाणी बीलांचा प्रश्न गंभीर-**

ठाणे शहरात सुमारे 250 कोटी रुपयांची पाणी बीले थकीत असून ठाणे महानगरपालिकेने वसुलीची मोहीम तीव्र केली आहे. यापैकी 157.7 कोटी रुपये चालू वर्षातील, तर 92.28 कोटी रुपये जुनी थकबाकी आहे. ही संपूर्ण थकबाकी चालू आर्थिक वर्षात वसूल करण्याचे आदेश महापालिकेला देण्यात आले आहेत. एप्रिलपासून आतापर्यंत 43 कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. वसुलीच्या भाग म्हणून टीएमसीकडून सर्व प्रभागांमध्ये पाण्याच्या जोडण्या खंडित करणे, मोटार पंप जप्त करणे आणि मीटर रूम सील करणे अशी कारवाई सुरू आहे. थकबाकी न भरता पाण्याची जोडणी पुन्हा सुरू करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही अधिकाऱ्यांनी दिला आहे.

# गोरेगाव–मुलुंड लिंक रोड चौथ्या टप्प्यात ! जुळे बोगदे, सहापदरी उड्डाणपूल उभारणीला वेग; मुंबईकरांना दिलासा कधी?



मुंबई: मुंबईतील वाहतूककोंडी फोडण्यासाठी मुंबई महापालिकेने गोरेगाव-मुलुंड जोडरस्त्याचे काम हाती घेतले आहे. या प्रकल्पाचे तिसऱ्या टप्प्यातील कामे सुरू असतानाच, आता चौथ्या टप्प्यातील कामाला गती देण्यासाठी निविदा काढण्यात आली आहे. चौथ्या टप्प्यातील कामांचा एकूण खर्च हा एक हजार २९३ कोटी रुपये आहे. जोडरस्ता पूर्ण होण्यासाठी मात्र चार ते पाच वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे.

गोरेगाव-मुलुंड जोड मार्ग हा मुंबईमधीलपूर्व आणि पश्चिम उपनगरांना एकमेकांशी जोडणारा चौथा प्रमुख जोडरस्ता आहे. विशेषतः उत्तर मुंबईतील वाहतुकीला याचा मोठा फायदा होणार आहे. सुमारे १२.२० किलोमीटरच्या या प्रकल्पामुळे पूर्व-पश्चिम उपनगरांदरम्यान नवीन जोडरस्ता तयार होईल आणि नागरिकांना वाहतूक कोंडीपासून दिलासा मिळेल. गोरेगाव ते मुलुंडदरम्यान प्रवासाचा कालावधी ७५ मिनिटांवरून सुमारे २५ मिनिटांपर्यंत कमी होईल. इंधन वापरात बचत होण्यासह मुंबईच्या वायू गुणवत्ता निर्देशांकातही सुधारणा होणार आहे.

कसा असेल नवा मार्ग?

गोरेगाव-मुलुंड जोड मार्ग प्रकल्प एकूण चार टप्प्यांमध्ये प्रस्तावित आहे. टप्पा तीन (अ) मध्ये उड्डाणपूल, एलिव्हेटेड रोड बांधकामाचा समावेश आहे. या प्रकल्पांतर्गत दिंडोशी- गोरेगाव फिल्मसिटीदरम्यान सहापदरी उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. आता चौथ्या टप्प्यातील कामाला गती देण्यासाठी महापालिकेने निविदा काढली आहे. चौथा टप्पा गोरेगाव पूर्व ऑबेरॉय मॉल येथील पश्चिम द्रुतगती मार्गाखालून भुयारी मार्ग आणि ऐरोली जंक्शन मुलुंड पूर्व येथे उड्डाणपूल होणार आहे. यासह अन्य कामेही केली जाणार असून त्यामुळे या टप्प्याचा खर्च एक हजार २९३ कोटी रुपये आहे.

चौथा टप्पा तीन वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहे. यामध्ये पूर्व द्रुतगती महामार्ग आणि गोरेगाव-मुलुंड लिंक रोड जंक्शनमध्ये सुधारणा होणार आहे. गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता चार टप्प्यांत करताना पहिल्या टप्प्यात नाहूर येथील रेल्वे मार्गावर उड्डाणपुलाचे काम असून ते जवळपास पूर्ण झाले आहे. तर दुसऱ्या टप्प्यात गोरेगाव मुलुंड जोडरस्ता रुंदीकरण असून तेही पूर्णत्वास येत आहे.


---

# दिव्यांग, वृद्धांसाठी गृहमतदानाची सुविधा नाही; महापालिका निवडणुकांबाबत आयोगाचा मोठा निर्णय



मुंबई : दिव्यांग आणि वृद्ध मतदारांना देण्यात येणाऱ्या गृहमतदानाची सुविधा आगामी महापालिका निवडणुकांमध्ये देण्यात येणार नसल्याचे राज्य निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. बहुसदस्यीय प्रभाग असल्याने मतदानातील तांत्रिक अडचण लक्षात घेता असे करणे शक्य नसल्याचे आयोगाने म्हटले आहे; परंतु मुंबई महापालिकेबाबत याविषयीचा निर्णय स्वतंत्रपणे घेण्यात येणार असल्याचेही आयोगाकडून अधोरेखित करण्यात आले आहे. तसेच, राजकीय पक्षांनी मोठ्या गृहनिर्माण संकुलांमध्ये मतदान केंद्रे उभारण्यास विरोध केल्याने त्याविषयीही केवळ मुंबई महापालिकेबाबत वेगळा निर्णय घेण्यात येईल, असेही आयोगाने सांगितले.

निवडणुकी पूर्वतयारीसाठी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक शुक्रवारी राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात बोलाविण्यात आली होती. या वेळी आगामी मतदानाबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारेयांनी प्रतिनिधींना दिली. लोकसभा; तसेच विधानसभा निवडणुकीत दिव्यांग आणि वृद्ध मतदारांसाठी गृहमतदानाची सुविधा देण्यात आली होती. मात्र, आगामी पालिका निवडणुकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग असल्याने ती देता येणार नसल्याचे आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले. प्रत्येक मतदारासाठी किमान दोन ते तीन ईव्हीएम घेऊन जाणे आणि मतदान करून घेणे तांत्रिकदृष्ट्या अडचणीचे ठरेल असे सांगण्यात आले. मात्र, अशा मतदारांना घेऊन आलेली वाहने, मतदान केंद्रांच्या दारापर्यंत नेण्याची तसेच त्या मतदारांचे मतदान केंद्र तळमजल्यावरच ठेवण्याच्या स्पष्ट सूचना दिल्याचेही आयोगाने सांगितले. मोठ्या गृहनिर्माण संकुलांमध्ये मतदान केंद्रे असू नयेत, अशी एकमुखी मागणी या बैठकीत राजकीय पक्षांनी केली. अनेकदा अशा संकुलांमध्ये राहत असलेले बहुसंख्य पक्षाचे प्रतिनिधी मतदारांवर दबाव टाकतात; तसेच आपल्या पक्षाला मतदान न केल्यास यापुढे संकुलात सोयी-सुविधा पुरविणार नसल्याची धमकीही देत असल्याचे प्रतिनिधींनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. या वेळी मुंबई आणि पुणे वगळता अनेक ठिकाणी अशी संकुले कमी असल्याने त्याची महापालिका निवडणुकीतगरज नसल्याचे आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले.



# अक्रोड

## शुक्राणूंची संख्या सुधारण्यात सहाय्यक



अलीकडेच करण्यात आलेल्या एका संशोधनामध्ये असे आढळून आले होते की, अक्रोड खाणाऱ्या पुरुषांमध्ये शुक्राणूंचे प्रमाण वाढते. एवढेच नव्हे तर अक्रोड शुक्राणूंची गुणवत्ता सुधारण्यामध्येही मदत करतात.

युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियाच्या संशोधकांनी विशी आणि तिशीतल्या युवकांच्या गटांना तीन महिन्यांपर्यंत दररोज ७५ ग्रॅम अक्रोड खाण्यास सांगितले होते.

संशोधकांना असे आढळून आले होते की, ज्यांनी दर्शविण्यात आल्याप्रमाणे अक्रोड खाल्ले होते त्यांच्या शुक्राणूंची संख्या आणि गुणवत्तेमध्ये अक्रोड न खाणाऱ्यांच्या तुलनेत लक्षणीय फरक होता. वैज्ञानिकांनी या प्रयोगासाठी अक्रोड निवडले होते, कारण होते की अक्रोडमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये चांगले पॉलिअनसॅच्युरेटेड फॅट्स असतात. त्यामध्ये पुष्कळ प्रमाणात ओमेगा-३ आणि ओमेगा-६ सुद्धा असतात. हे घटक तैलीय माशांमध्येही जास्त प्रमाणात पाहायला मिळतात. असे मानण्यात येते की, शुक्राणूंची वृद्धी आणि कार्यक्षमतेमध्ये हे दोन्हीही घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. परंतु, पाश्चिमात्य लोकांच्या आहारामध्ये त्याची कमतरता आढळून येते.

प्रत्येक सहा युगुलांपैकी एका दाम्पत्यामध्ये गर्भधारणेसंबंधित समस्या पाहायला मिळतात. त्यांपैकी ४०% समस्या पुरुषांमध्ये TTS असलेल्या शुक्राणूंच्या संख्येसंबंधित असतात.

संशोधकांनी पुरुषांच्या शुक्राणूंची तीव्रता, ते किती वेगाने गती करतात याचे आणि आनुवंशिक रचनेचे विश्लेषण केले होते.

जे पुरुष अक्रोड खात होते त्यांच्या शुक्राणूंच्या गतीमध्ये अक्रोड न खाणाऱ्या पुरुषांच्या शुक्राणूंच्या गतीपेक्षा तीन टक्क्यांची वृद्धी पाहायला मिळाली होती. अक्रोड खाणाऱ्या फारच थोड्या पुरुषांमध्ये अॅन्युप्लॉईडी नावाचा डिसऑर्डर पाहायला मिळाला होता, ज्यामध्ये शुक्राणूंमध्ये क्रोमोझोमचे प्रमाण अत्यंत जास्त किंवा अगदीच कमी पाहायला मिळाले आहे.

# काजू चुकीच्या वेळी खाल्ले तर होतो धोका !



काजू पौष्टिक, स्वादिष्ट पण योग्य वेळी खाल्ले नाहीत तर आरोग्याच्या अनेक समस्यांना आमंत्रण देऊ शकतात !


**गरम पदार्थांसोबत काजू खाल्ल्याने काय होते ?**

शरीरातील उष्णता अचानक वाढते, रक्तदाब वाढतो, विशेषतः ज्यांना BP चा त्रास आहे त्यांच्यासाठी धोकादायक हृदयावर ताण येतो.

**काय होऊ शकते :** थकवा, डोकेदुखी, हृदयविकार.

**काजू खाण्याची योग्य वेळ व पद्धतः** सकाळच्या नाश्त्यानंतर, संध्याकाळी हलक्या खाण्यासोबत, थंड किंवा साध्या अन्नासोबत टाळा. गरम दूध, मसालेदार जेवण, सूप. काजू आरोग्यासाठी फायदेशीर आहेत, पण चुकीच्या वेळेस खाल्ल्यास नुकसानकारक ठरू शकतात.

# गोड पदार्थ खाण्याची सवय सोडणे अवघड



बहुतेक लोकांना गोड पदार्थच जास्त आवडतात. परंत, काही हुशार व्यक्ती साखर आणि गुळापासून खूप लांब राहतात. काही प्रकारचे पदार्थ किंवा चहाचे प्रकार बऱ्याच व्यक्तींना फारच गोड लागतात, तर काही लोकांना तोच खाद्यपदार्थ किंवा चहा अतिशय मिळमिळीत लागतो, पण असे होण्याचे काय कारण असू शकते ?

मिठाच्या बाबतीतही असेच पाहायला मिळते. संशोधकांनी अनेक वर्षांपासूनच्या अथक प्रयत्नांनी शोधून काढले आहे की, मुलाला आहाराबाबतीत जशी सवय करवून देण्यात येते, ती जवळजवळ शेवटपर्यंत कायम टिकून राहते. म्हणजे की आपण मुलाला गोड पदार्थ खाण्याची सवय करवून दिली, तर तो वृद्ध होईपर्यंत गोड पदार्थांचाच चाहता बनून राहतो. मुलाला लहानपणापासूनच जास्त साखरयुक्त दूध पाजण्यात आले आणि आइसक्रीमची सवय लावून देण्यात आल्यास मोठे झाल्यानंतर त्याला मध्यम गोड पदार्थ जरादेखील आवडणार नाहीत.

दुसरीकडे कमी गोड पदार्थ खाण्याची सवय असणाऱ्या मुलांना भविष्यात चॉकलेटच्या ऐवजी फळे खाणे जास्त आवडते. निष्णांत असे समजतात की जर अशा सवयी बदलायच्या असतील तर फारच अडचणी येतात.

परंतु, वास्तव हे आहे की फारच गोड किंवा खारट पदार्थांचा शौक त्यागायचा असेल तर आहारातून साखर आणि मिठाचे प्रमाण टप्प्या- टप्प्याने दूर केले पाहिजे.

# वजन कमी करण्याचे आव्हान आता उचलाच



दिवाळी झाली, मस्त फराळ करून झाला, गोड धोड, हौस मौज सारे काही झाले तर मग आता वाट पाहू नका, वजन कमी करण्याचे आव्हान आता घ्याच.

वजन कमी करण्यासाठी जिरे, मध आणि लिंबू यांचे पाणी वजन कमी करण्यासाठी जिरे, मध आणि लिंबू यांचा वापर करून एक सोपा आणि प्रभावी घरगुती उपाय कसा तयार करायचा ते खालीलप्रमाणेः

**साहित्यः** १ चमचा जिरे, १चमचा मध, लिंबाच्या ४ स्लाईस, १ ग्लास गरम पाणी.

**कृती :** सर्वप्रथम, पाणी गरम करून घ्या. एका ग्लासमध्ये १ चमचा जिरे, १ चमचा मध आणि लिंबाच्या ४ स्लाईस टाका. या मिश्रणात गरम केलेले पाणी ओता.

**सेवन करण्याची पद्धतः** हे मिश्रण रोज सकाळी उपाशी पोटी नियमितपणे हे पेय घेतल्यानंतर अर्धा तास काहीही खाऊ किंवा पिऊ नका. हा उपाय सलग ७ दिवस करा, त्यानंतर २ दिवसांचा ब्रेक घ्या.

पुन्हा ७ दिवस हा उपाय सुरू ठेवा व पुन्हा २ दिवसांचा ब्रेक घ्या. अशा प्रकारे एकूण २१ दिवसांसाठी हा उपाय करा.

**लक्षात ठेवाः उच्च रक्तदाब, मधुमेह (शुगर) किंवा हृदयविकार (Heart ttack) असलेल्या व्यक्तींनी हा उपाय सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.**

# आंधळे दळतय आणि कुत्र पीठ खात्यात ”

भारत हा अत्यंत श्रीमंत देश होता. भारतीयांची संपत्ती लुटण्यासाठी अनेक लुटारूंनी अरबस्तानी, तुर्कस्तानी, इराणी, अफगाणी. मोगल, पोर्तूगीज, डच, फ्रान्सीसी, इंग्रज, इत्यादी दैशांनी प्रचंड सैन्यानिशी भारतावर वेळोवेळी आक्रमण केले. आणि भारतीयांना सतत लुटायला मिळावे म्हणून त्यांना गुलाम बनवल. काहींनी व्यापाराच्या नावाने तेच केल. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आजाद हिंद सेनेमुळे आता काय होऊ शकेल ह्या विचाराने भयभीत होऊन इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य दिले आणि इंग्रज भारतातून निघूनही गेले.

१९४७ साली भारताचे विभाजन झाल आणि मुसलमानांसाठी वेगळ राष्ट्र बनवल. पण ज्या ३.५ करोड मुसलमानांनी मुस्लीम लीगला मतदान करून पाकिस्तान बनवलं, परंतु ते पाकिस्तानात गेलेच नाहीत. आता त्यांचे वंशज ३०हा३५ करोड झालेत. मुसलमानांसाठी वेगळे राष्ट्र पाकिस्तान बनविले त्याला ७७ वर्षे झालीत. तरी एवढे मुसलमान भारतात कसे ? त्यांना पाकिस्तानात हाकलून देण्यासाठी काँग्रेसने किंवा आर.एस. एस. आणि भाजप ने काहीच केल नाही. उलट त्यांना निवडणुकीला उभे राहण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. शिवाय पाणी, गॅस, लाईट, रेशन, घरदार, नोकरी, व्यवसाय सगळे मिळतय. ह्याला म्हणतात, "आंधळ दळतय आणि कुत्र पीठ खातय".जे मुस्लीम विभाजनाच्या वेळी पाकिस्तानात गेले नाहीत, त्यांचे वंशज भारतातल्या हिंदू स्त्रि-पुरूषांवर आता अत्याचार करत आहेत, मारहाण करत आहेत. १९९० साली काश्मीर मधील हिंदूना काश्मीर मधुन पलायन करायला लावले आणि आता २०२५ मध्ये बंगालमधील हिंदू स्त्रि-पुरूषांवर, अत्याचार करून, स्त्रियांवर बलात्कार करून, त्यांना मारहाण करून त्यांना बंगाल मधुन पलायन करायला भाग पाडत आहेत. परंतु ह्या असहाय्य हिंदूंना काँग्रेसने मदत केली नाही किंवा आर. एस .एस. ने किंवा भाजपने मदत केली नाही.

भारतात स्वातंत्र्यानंतर कित्येकदा हिंदू-मुस्लीम दंगली झाल्या पण काँग्रेस, आर. एस. एस. आणि भाजप हिंदू असुन ह्या दंगलीच्या वेळी त्यांनी हिंदूंना मदत केली नाही. ९ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मस्जिद पडल्यावर मुस्लीम समुदायाने दंगली घडवून आणल्या. त्या वेळीही काँग्रेस, आर.एस. एस. आणि भाजपने हिंदूंना मदत केली नाही. बरेच हिंदू म्हणतात शिवसेना नसती तर आपलं काही खरं नव्हतं. राजकारणात काँग्रेस, भाजप आणि शिवसेना काय तडजोड करतात ह्याच्याशी आम्हाला काहीही देण-घेण नाही. आम्ही आमचं संरक्षण कोण करेल हेच बघणार.

म्हणुन श्रीमान राज ठाकरे आणि श्रीमान उद्धव ठाकरें एकत्र येत आहेत ही हिंदूसाठी खूप चांगली गोष्ट आहे. आणि जे शिवसैनिक भाजप बरोबर आहेत त्यांनीही ह्याचा विचार करावा.

॥ जय महाराष्ट्र ॥

**अरूण गडकरी**
**मराठी कादंबरीकार**
**(महामंत्री, अग्नीकुंड इत्यादी**
**7738224797)**

# नाताळ-नवीन वर्षानिमित्त प्रवाशांना खास भेट! कोकण रेल्वेवर धावणार विशेष गाड्या


मुंबई: कोकण रेल्वेच्या प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. नाताळ आणि नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वेकडून विशेष गाड्या सोडण्यात येणार आहेत. त्यामुळे सणासुदीच्या काळात प्रवाशांना गर्दीचा सामना करावा लागणार नाही. मात्र, या विशेष गाड्यांसाठी प्रवाशांकडून अतिरिक्त भाडे आकारले जाणार आहे. जाणून घेऊया या गाड्या कुठून कुठपर्यंत धावणार आहेत आणि त्यांचे वेळापत्रक काय आहे.

नाताळ आणि नवीन वर्षानिमित्त कोकण रेल्वे मार्गावर मध्य प्रदेश, छत्तीसगड, गोवा आणि कर्नाटककडे जाणाऱ्या विशेष गाड्या सोडण्यात येणार आहेत. कोकण रेल्वे आणि पश्चिम रेल्वेच्या समन्वयाने मध्य प्रदेशातील डॉ. आंबेडकर नगर ते कर्नाटकातील ठोकूर दरम्यान विशेष रेल्वेगाडी चालवली जाणार आहे. या गाड्यांना महाराष्ट्रात वसई रोड, भिवंडी रोड, पनवेल, रोहा, मानगाव, खेड, चिपळूण, रत्नागिरी, राजापूर रोड, वैभववाडी, कनकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ आणि सावंतवाडी स्थानकांवर थांबे देण्यात आले आहेत.



# मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याची तयारी! 17 ठिकाणी पुनर्विकास प्रकल्प

आगामी मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारकडून हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने हक्कांच्या घरांच्या दृष्टीने अनेक योजनांची घोषणा करण्यात आली आहे. आता मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याच्या दिशेनेही सरकारने पाऊल उचलले आहे. १७




ठिकाणी 'एसआरए समूह पुनर्विकास' प्रकल्प साकारण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी विधान परिषदेत जाहीर केले.

कुठे होणार प्रकल्प?

शिंदे यांनी यासंदर्भात निवेदन दिले. यामध्ये या प्रकल्पाची रूपरेखा मांडण्यात आली. '५० एकर किंवा त्यापेक्षा मोठ्या खासगी, शासकीय, निमशासकीय जमिनींवर आता एकत्रितपणे झोपडपट्टी पुनर्विकास योजना आखण्यात आली आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात मुंबईतील अँटॉप हिल, कृष्णनगर आणि केतकीपाडा (बोरिवली), गोपीकृष्णनगर (दहिसर), ओशिवरा, गोवंडी, चित्ता कॅम्प (ट्रॉम्बे), चेंबूर, टागोरनगर (विक्रोळी), विक्रोळी पार्कसाइट, भांडुप अशा १७ प्रमुख ठिकाणांची निवड करण्यात आली आहे. यामुळे मुंबईतील लाखो झोपडपट्टीवासीयांना मोठा दिलासा मिळणार आहे,' असे शिंदे यांनी नमूद केल.

# गोलंदाजांचा भेदक मारा; दक्षिण आफ्रिकेचा ७ गडी राखून पराभव, मालिकेत २-१ अशी आघाडी

**धर्मशाला:** येथील निसर्गरम्य एचपीसीए स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेवर ७ गडी राखून दणदणीत विजय मिळवला. या विजयासह भारताने ५ सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी महत्त्वाची आघाडी घेतली आहे. भारतीय वेगवान गोलंदाजांनी केलेल्या जबरदस्त कामगिरीच्या जोरावर पाहुण्या दक्षिण आफ्रिकेचा डाव अवघ्या ११७ धावांत संपुष्टात आला. हे माफक आव्हान भारतीय फलंदाजांनी १६ व्या षटकात (१५.५ षटके) सहज पार केले.

सामन्याची सुरुवात भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारण्याने झाली. धर्मशाळेच्या खेळपट्टीवर सुरुवातीला मिळणाऱ्या स्विंगचा फायदा घेण्यासाठी घेतलेला हा निर्णय भारतीय गोलंदाजांनी अगदी सार्थ ठरवला. अर्शदीप सिंग आणि हर्षित राणा या वेगवान जोडीने आफ्रिकेच्या फलंदाजीला खिंडार पाडले. अर्शदीपने आपल्या पहिल्याच षटकात रीझा हेंड्रिक्सला शून्यावर बाद केले, तर हर्षित राणाने डिकॉकला माघारी धाडत आफ्रिकेची अवस्था ३ बाद ७ अशी केविलवाणी केली.

केवळ कर्णधार एडन मार्करमने एकाकी झुंज देत ६१ धावांची खेळी केली, ज्यामुळे आफ्रिकेला १०० धावांचा टप्पा ओलांडता आला. मात्र, इतर कोणत्याही फलंदाजाला भारतीय गोलंदाजीचा सामना करता आला नाही. अर्शदीप सिंगने ४ षटकात केवळ १३ धावा देत २ बळी घेतले, तर वरुण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव यांनीही प्रत्येकी दोन बळी मिळवत धावगती रोखून धरली. हार्दिक पांड्यानेही एक बळी मिळवत आपल्या टी-२० कारकीर्दीतील १०० विकेट्सचा टप्पा पूर्ण केला.

विजयासाठी ११८ धावांच्या लक्षाचा पाठलाग करताना भारताने आक्रमक सुरुवात केली. युवा सलामीवीर अभिषेक शर्माने अवघ्या १८ चेंडूत ३ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ३५ धावांची धडाकेबाज खेळी केली. शुभमन गिलने (२८) त्याला चांगली साथ दिली. या दोघांच्या सलामीने भारताचा विजय सुकर केला. त्यानंतर तिलक वर्मा (नाबाद २५) आणि शिवम दुबे (नाबाद १०) यांनी संयमी खेळ करत संघाला विजयापर्यंत पोहोचवले. १५.५ षटकात ३ गडी गमावून भारताने १२१ धावा करत सामना खिशात घातला.

या विजयामुळे भारतीय संघाने मालिकेत जोरदार पुनरागमन केले आहे. वेगवान गोलंदाजांची शानदार कामगिरी आणि अभिषेक शर्माची फटकेबाजी या सामन्याचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. अर्शदीप सिंगला त्याच्या उत्कृष्ट गोलंदाजीसाठी 'सामनावीर' पुरस्काराने गौरवण्यात आले. आता मालिकेतील चौथा सामना लखनौ येथे होणार असून मालिका विजयाच्या दृष्टीने तो निर्णायक ठरेल.



# सूर्यास्त जवळ?

**भास्कर गाणेकर:** टी-२० क्रिकेटमध्ये अद्यावत पण अफलातून स्किल्स असलेला भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव सध्या आपल्या कारकिर्दीतील सर्वात कठीण काळातून जात आहे. मागील २५ सामन्यांत त्याला केवळ एकदाच पन्नाशी पार करण्यात यश आले आहे. एके काळचा आयसीसी क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या सूर्यकुमारला नक्की झाले काय? फेब्रुवारी महिन्यात होऊ घातलेल्या टी-२० विश्वचषकात जर त्याचा असाच फॉर्म राहिला तर भारत आपले जेतेपद कायम टिकवून ठेवेल का?

३५ वर्षीय सूर्या संघात तरी राहील का? असे अनेक प्रश्न त्याच्या सध्याच्या फॉर्मवरून क्रिकेट रसिकांना पडत आहेत.

२०२३ च्या विश्वचषक अंतिम फेरीनंतर एकदिवसीय संघातून बाहेर फेकल्या गेलेल्या सूर्यकुमारला २०२४ च्या टी-२० विश्वचषकात संधी देण्यात आली होती. त्याने घेतलेला डेव्हिड मिलरचा तो झेल जणू भारताला ट्रॉफी देऊनच गेला. रोहित शर्मा त्या विश्वचषकानंतर क्रिकेटच्या सर्वात छोट्या प्रकारातून निवृत्त होत सूर्यकुमारकडे संघाची कमान सोपवून गेला. हार्दिक पांड्यासारखा आयपीएल विजेता कर्णधार असतानाही संघ व्यवस्थापनाने सूर्यकुमारवर विश्वास ठेवत नेतृत्वाची जबाबदारी दिली. सूर्यानेही ती लीलया पार पाडत संघाला एकामागून एक मालिका जिंकून दिल्या. त्याच्या वैयक्तिक खेळातही सुधारणा करीत खोऱ्याने धावा उपासल्या. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध २०२३ च्या टी-२० मालिकेत एक शतक व एक अर्धशतक झळकावत त्याने मालिकेत बरोबरी साधून दिली.

मागील वर्षांपासून सूर्याच्या कामगिरीवर जणू ग्रहणच लागेल आहे. नोव्हेंबर २०२४ पासून सूर्याकुमार यादवने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये २१ डावांत केवळ २२९ धावा केल्या असून त्याची सरासरी १३.२७ आणि स्ट्राइक रेट १२०.१० आहे. या कालावधीत त्याला एकही अर्धशतक करता आलेले नाही, तसेच फक्त दोन डाव २० चेंडूंहून अधिक काळ टिकले आहेत. सध्या चालू असलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या टी-२० मालिकेतही त्याला फारशी चमक दाखवता आलेली नाही. पहिल्या सामन्यात १२, दुसऱ्या सामन्यात ५ व आजची १२ धावांवर तो बाद झाला. मुख्य म्हणजे त्याने त्याच्या तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीस न येत चौथ्या क्रमांकावर येत फलंदाजीचा क्रमही गडबडवला.

सूर्यकुमारची कमी धावसंख्या चिंतेची बाब असली तरी, त्याच्या बाद होण्यामागे कोणताही ठरावीक पॅटर्न दिसून येत नाही. नोव्हेंबर २०२४ पासून तो वेगवान गोलंदाजांविरुद्ध १७ वेळा बाद झाला आहे—कधी सीमारेषेवर झेल देत, कधी विकेटकीपरकडे झेल देत, तर कधी चेंडू स्वतःच्या विकेटवर मारत—आणि फिरकीपटूंविरुद्ध तो फक्त एकदाच बाद झाला आहे. अशी कमी कामगिरी कोणत्याही फलंदाजाकडून होऊ शकते, विशेषतः टी-२०मध्ये उच्च जोखमीचा क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूकडून. सूर्यकुमार याआधीही अशा परिस्थितीतून गेला आहे आणि त्याने त्या खराब फॉर्ममधून यशस्वीपणे बाहेर पडले आहे, हे विसरणे सोपे आहे.

सूर्यकुमारने इंग्लंडविरुद्ध घरच्या मैदानावर पाच डावांत दोनदा शून्यावर बाद झाल्यानंतर आयपीएल २०२५ मध्ये प्रवेश केला होता. मात्र त्याने नेत्रदीपक कामगिरी करत आपल्या फॉर्ममध्ये जबरदस्त बदल घडवला. १६ डावांत ६५.१८ च्या सरासरीने आणि १६७.९१ च्या स्ट्राइक रेटने त्याने ७१७ धावा केल्या. त्या वर्षी त्याने एमव्हीपी पुरस्कार जिंकला आणि मुंबई इंडियन्सला नॉकआउट फेरीत पोहोचवण्यात मोलाचा वाटा उचलला. आयपीएल आधी आणि नंतर मोठ्या धावा फारशा झालेल्या नाहीत, पण भारताच्या संघ व्यवस्थापनाला आशा आहे की आगामी मायदेशातील विश्वचषकाच्या तयारीत सूर्यकुमार पुन्हा एकदा आपली फॉर्म परत मिळवेल.

# पोरांनी उडवला पाकड्यांचा धुव्वा, १९ वर्षांखालील संघ ९० धावांनी विजयी

**दुबई:** येथील आयसीसी अकादमी मैदानावर झालेल्या १९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेतील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हाय-व्होल्टेज सामन्यात भारताने पाकिस्तानवर ९० धावांनी मोठा विजय मिळवला. या विजयासह भारतीय संघाने गट 'अ' मध्ये अव्वल स्थान पटकावले आहे. नाणे फेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ४६.१ षटकांत सर्वबाद २४० धावांचे लक्ष्य पाकिस्तानसमोर ठेवले. भारताकडून ॲरन जॉर्ज याने अप्रतिम फलंदाजी करत ८८ चेंडूत १२ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ८५ धावांची सर्वाधिक खेळी केली. त्याला कनिष्क चौहान याने ४६ चेंडूत ४६ धावा करून चांगली साथ दिली. मुख्य म्हणजे कर्णधार आयुष म्हात्रे आणि मागील सामन्याचा हिरो वैभव सूर्यवंशी यांच्या मोठ्या खेळीशिवायही भारताने २४० धावांपर्यंत मजल मारली. पाकिस्तान साठी मोहम्मद सय्यम (६७/३) आणि अब्दुल सुभान यांनी प्रत्येकी तीन बळी घेत भारताला मोठी धावसंख्या करण्यापासून रोखले. २४१ धावांच्या आव्हाना चा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ सुरुवातीपासूनच भारतीय गोलंदाजां समोर संघर्ष करताना दिसला. त्यांचा संपूर्ण संघ ४१.२ षटकांत केवळ १५० धावांवर बाद झाला. पाकिस्तानकडून फक्त हुजैफा अहसान याने एकाकी झुंज देत ८३ चेंडूत ९ चौकार आणि २ षटकारांसह ७० धावा केल्या. इतर फलंदाजांना मोठी भागीदारी करता आली नाही. भारताच्या गोलंदाजी समोर पाकिस्तानचा डाव पूर्णपणे कोसळला. दीपेश देवेंद्रन याने केवळ ७ षटकांत १६ धावा देत ३ महत्त्वपूर्ण बळी घेतले. कनिष्क चौहान याने फलंदाजीत ४६ धावा केल्यानंतर गोलंदाजीतही आपली चमक दाखवली. त्याने १० षटकांत ३३ धावा देत ३ बळी घेतले.



दीपेश देवेंद्रन आणि कनिष्क चौहान यांच्या प्रभावी कामगिरीमुळे भारताने ९० धावांनी मोठा विजय मिळवून स्पर्धेत आपला दबदबा कायम ठेवला आहे.

युवा सह्याद्री हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक अरुण आत्माराम माळी यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, ७, उद्योग भवन, शर्मा इंडस्ट्रीयल इस्टेट, वालभट रोड, गोरेगांव (पूर्व), मुंबई ४०० ०६३.
येथे छापून, प्रसाद आर्ट शॉप नं. एस-२, श्रीकृपा को. ऑ. हौ. सोसायटी, डॉ. आंबेडकर रोड, मुंबई-४०० ०३३ येथून प्रकाशित केले.
संपादक अरुण आत्माराम माळी. Contact: 9821004969 | Email: yuvasahyadri@gmail.com | Web.: www.yuvasahyadri.com